# जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार

गौण खनिज शाखा

☎ (०२५६४)२१०००६ Email id : miningndb@gmail.com FAX: (०२५६४)२१००४१

**सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता वाळू / रेती घाट निर्गतीकरीता ई-निविदा/ई-लिलावाची अधिसूचना**

क्रमांक/२०१९/गौखनि/कावि/१३५ नंदुरबार दिनांक : २५/०२/२०१९

महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८९/ख दिनांक ०३ जानेवारी, २०१८ व महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ७० मधील तरतुदीनुसार नंदुरबार जिल्ह्यातील वाळू/ रेती घाटाची निर्गती ई-निविदा /ई-लिलावाव्दारे करावयाची आहे.

मा. आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक.मशा/जमिन/१/अपसेट प्राईज/नंदुरबार/१/२०१८ जा.क्र.१५३० दिनांक ०५/०९/२०१८ नुसार नंदुरबार जिल्ह्यातील लिलावास योग्य रेती घाटाच्या हातच्या किमंतीस (Upset Price) मान्यता दिलेली आहे. तसेच दिनांक ०४/०२/२०१९ रोजी राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समिती (SEAC) व दिनांक ०७/०२/२०१९ राज्यस्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरण (SEIAA) समितीच्या बैठकीत नंदुरबार जिल्ह्यातील ०३ वाळू / रेती घाटांना मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच दि. १८/०२/२०१९ रोजीच्या पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीस अधीन राहून ई -निविदा व ई- ऑक्शनद्वारे लिलाव करण्यात येणार आहेत. सदरचे लिलाव मा. राष्ट्रीय हरीत न्यायधिकरण येथे दाखल केलेल्या मुळ अर्ज ३६३/२०१४ व ३६६/२०१५ ते ३६८/२०१५ अंतिम आदेशाच्या /निर्णयाच्या तसेच राज्य शासनाच्या पुढील निर्देशाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत. लिलावामध्ये सहभागी होण्यास इच्छुकांनी या संदर्भात सर्व तरतूदी, निर्णय व कायदे यांची माहिती पुरेशी आधी घ्यावी.

जाहीर लिलावासंबंधी सर्व माहिती, वाळू लिलावाच्या अटी व शर्ती, वाळू गटाची शासकीय किंमत व इतर सर्व माहिती गौणखनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार व जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी /तहसिलदार यांचे कार्यालय येथे व https://nandurbarco.abcprocure.com व www.nandurbar.nic.in या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्यात आलेली आहे. इच्छूक व्यक्तीस/ संस्थेस/ लिलावधारकांना/ कंत्राटधारकांना/कंत्राटदारांना या लिलावात भाग घेण्याकरिता विनंती करण्यात येत आहे.

ई-निविदा व ई-ऑक्शन प्रक्रीयेत भाग घेणाऱ्या सर्वांना ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे आवश्यक राहील. ऑनलाईन नोंदणी करीता (Registration) पुढील माहिती व कागदपत्राची साक्षांकित प्रती इच्छूक निविदाधारकास बंधनकारक आहे. (१) ई-मेल आयडी (२) पॅनकार्ड व आधार कार्ड (३) टिन नंबर (कंपनी असल्यास) (४) मागील तीन वर्षाचे आयकर विवरण पत्र (सन-२०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८) (५) जीएसटी नंबर (६) निविदेतील अटी शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र अनिवार्य आहे.

लिलावाच्या ई-निविदा दाखल करु इच्छीणाऱ्या व्यक्तींना अर्ज फी व लिलावात भाग घेण्यासाठी भरावयाची इसारा रक्कम (EMD) व इतर सर्व रक्कम ऑनलाईन पध्दतीने जमा करावी लागेल. ज्या वाळूगटांची किंमत रु. १० लक्ष पेक्षा जास्त आहे. त्याकरीता अर्ज फी रु. ५,०००/- (अक्षरी रक्कम रु. पाच हजार मात्र) आणि प्रोसेसिंग फी रु. १,५९३/- (अक्षरी रक्कम रु. एक हजार पाचशे त्र्येण्णव)एकुण ६,५९३/- तसेच ज्या वाळू घाटाची किंमत रु. १० लक्ष पेक्षा कमी आहे त्याकरीता अर्ज फी रक्कम रु. २,०००/- (अक्षरी

रक्कम रु. दोन हजार मात्र) आणि प्रोसेसिंग फी रु. १,५९३/-(अक्षरी रक्कम रु. एक हजार पाचशे त्र्येण्णव) असे एकुण रु. ३,५९३/- तसेच इसारा रक्कम (EMD) प्रत्येक वाळू/ रेती घाटाच्या हातच्या किंमतीच्या (Upset Price) २५ टक्के रक्कम रु. आरटीजीएस (RTGS) व्दारे जमा करावी लागेल.

जी व्यक्ती/संस्था ज्या वाळू गटाकरीता ई-निविदा भरेल, अशाच व्यक्ती/संस्थांना ई-ऑक्शन मध्ये भाग घेता येईल. ई-निविदाही ई-ऑक्शन झाल्यानंतर खुली करण्यात येणार आहे. या दोन्ही प्रकारच्या म्हणजेच निविदा आणि लिलाव यापैकी ज्यामध्ये सर्वाधिक दर नमुद असतील त्या ठेकेदारास लिलाव देण्यात येईल.

ई-टेंडरींग (ई-निविदा) व ई-ऑक्शन (ई-लिलाव) पद्धतीने लिलाव करावयाचा वाळू गटाचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | दि. २७.०२.२०१९ | ई - लिलाव सुचना प्रसिध्दी |
| २ | दि.२७.०२.२०१९ ते दि. ०७.०३.२०१९ | • दि. २७.०२.२०१९ (बुधवार) सकाळी १०.०० वा. पासून नोंदणी (Registration) ऑनलाईन पद्धतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. ती दि. ०७.०३.२०१९ (गुरुवार) सायंकाळी ०६.०० पर्यंत सुरु राहील. यानंतर संगणकीय नोंदणी बंद होईल.<br>• नोंदणी केलेल्या व्यक्ती /संस्थांनी दि. २७.०२.२०१९(बुधवार) ते दि. ०७.०३.२०१९ (गुरुवार) या कालावधीत सकाळी १०.०० वा.पासून ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत उपजिल्हाधिकारी (प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे संगणकीय नोंदणीत दाखल केलेले सर्व कागदपत्रे प्रत्यक्षात सादर करुन नोंदणी मान्य करुन घेणे. |
| ३ | दि.२७.०२.२०१९ ते दि. १२.०३.२०१९ | • दि. २७.०२.२०१९ (बुधवार) ते दि. १२.०३.२०१९ (मंगळवार) या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपावेतो ई-निविदा व ई-ऑक्शनसाठी भाग घेणाऱ्या लिलावधारकांना वाळु/रेती घाटाची २५% अनामत रक्कम (EMD) जमा करणे.<br>• EMD ची रक्कम दि. १२.०३.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करणे अपेक्षीत आहे. त्यानंतर जमा केलेल्या EMD च्या रक्कमेबाबत विलंब झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. |
| ४ | दि.२७.०२.२०१९ ते दि. १३.०३.२०१९ | • दि. २७.०२.२०१९ (बुधवार) ते दि. १३.०३.२०१९ (बुधवार) सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत निविदा ऑनलाईन पद्धतीने (संगणकीय पद्धतीने) जमा करणे.<br>• सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय) स्वीकारणे बंद होईल. |
| ४ | दि. १४.०३.२०१९ (गुरुवार) | • दि.१४.०३.२०१९ (गुरूवार) सकाळी ११.०० वा.पासून ई-निविदा भरलेल्या निविदा धारकांना ई-ऑक्शनसाठी ऑनलाईन पद्धतीने संगणकीय प्रणालीमध्ये वेबसाईटवर खुली करुन देण्यात येईल. |
| ५ | दि. १५.०३.२०१९ (शुक्रवार) | • दि. १५.०३.२०१९ (शुक्रवार) सकाळी ८.०० ते सायं. ५.०० पर्यंत ई-ऑक्शन ऑनलाईन सुरु राहील. वेळ समाप्तीच्या वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी १० मिनिटे प्रमाणे ३ (तीन) वेळा वाढ करण्यात येईल. त्यानंतर ई-ऑक्शन करता वेळ वाढवून दिला जाणार नाही. |
| ६ | दि. १५.०३.२०१९ (शुक्रवार) | • दिनांक १५.०३.२०१९ (शुक्रवार) सायंकाळी ०६.०० वा.पासून पुढे जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे ई-ऑक्शन बाबतचा अंतिम निर्णय. |

सर्वोच्च ई-ऑक्शनधारकास (ई-लिलावधारकास) / ई-टेंडरधारकास (ई-निविदा) आलेल्या सर्वोच्च ई-बोलीनुसार वाळू स्थळ मंजूर करण्यात येईल. ज्यांच्या नावे लिलाव कायम होईल. लिलाव कायम केल्यावर लिलावधारकांना शासन निर्णय दिनांक ०३/०१/२०१८ च्या सर्व अटी व शर्ती तसेच राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समिती (SEAC) व राज्यस्तरीय पर्यावरण आघात प्राधिकरण समितीच्या (SEIAA) मान्यतेमधील सर्व अटी व शर्तीस लागु राहतील.

**ई-टेंडरींग (ई-निविदा) अथवा ई-ऑक्शन (ई-लिलाव) स्विकारण्याचे वा नाकारण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी राखून ठेवलेले आहेत.**

इच्छुक निविदा धारकांनी नोंदणी प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी, डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सत्यापन आणि प्रथम स्तरावरील मंजूरीसाठी एबीसी प्रोक्युअर कंपनीचे प्रतिनिधींशी कृपया खालील क्रमांक वर संपर्क साधावा.

| अ.क्र. | प्रतिनीधीचे नाव | संपर्क क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | सोनूटॅक | ०७९ ६८१३६८७८ | --- | sonu@abcprocure.com |
| २ | सताब्दीडे | ०७९ ६८१३६८४५ | +९१ ६३५३२१७०८० | satabdi@abcprocure.com |

ई-निविदा आणि ई-लिलाव प्रक्रिया सुरु असतांना तांत्रिक मदतीसाठी एबीसी प्रोक्युअर कंपनीचे प्रतिनिधींचे दूरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रतिनीधीचे नाव | दुरध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी | कॉमन ई- मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पंकेश कुमार | ०७९ ६८१३६८४८ | ९३७४५१९७२९ | pankesh@eptl.in | support@abcprocure.com |
| २ | | ०७९ ६८१३६८४९ | | | |
| ३ | | ०७९ ६८१३६८५० | | | |
| ४ | | ०७९ ६८१३६८५४ | | | |
| ई-पेमेंट संबंधित समर्थनासाठी, payment@eptl.in वर मेल करा आणि उपरोक्त क्रमांकांवर संपर्क साधा. | | | | | |

**लिलाव प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या लिलावधारकांसाठी महत्त्वाच्या सूचना :-**

- रेती घाट लिलावाकरीता सहभागी होणाऱ्या बोलीदाराने डिजिटल सिग्नेचर प्रमाणपत्र वर्ग २ किंवा ३ साइनिंग + एनक्रिप्शन नोंदणीच्या वेळी संलग्न करणे आवश्यक आहे.
- बोलीधारकांना घाट निवडणे व त्यांना खरेदी करावयाचे घाटांचे दर नमुद करावे. त्यानंतर निवडलेल्या घाटांसाठी सहभाग शुल्क, निविदा दस्तऐवज फी आणि इसारा रक्कम देण्यास बोलीधारक सक्षम असतील.
- आर.टी.जी.एस / एन.ई.एफ.टी द्वारे देय रक्कम आपल्या बिडर आयडी मध्ये उपलब्ध करण्यासाठी एक दिवस अगोदर आगाऊ करणे आवश्यक आहे. त्यासाठी पेमेंट गेटवेवर आर.टी.जी.एस / एन.ई.एफ.टी पर्यायाद्वारे कागदपत्र शुल्क / ईएमडी देयक भरण्याआधी किमान एक दिवस अगोदर निधी पाठवायचा आहे.
- एकदा बोलीदाता अंतिम सबमिशन पूर्ण केल्यानंतर, तो इतर घाटांना जोडण्यास किंवा बोली करण्यास सक्षम असणार नाही. म्हणूनच बोलीदाराने स्वतः ला त्याच्या बिडने स्वतः ची पूर्तता करावी आणि ती फक्त ई-निविदा मध्ये "अंतिम सबमिशन" चरण पूर्ण करेल.

ऑनलाईन ई-निविदा / ई-लिलावाच्यावेळी कोणत्याही कारणास्तव इंटरनेट, सर्व्हर, विद्युत, किंवा अन्य तांत्रिक कारणामुळे अडथळा आल्यास जिल्हाधिकारी कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहित मुदतीत रकमा जमा करणेची पूर्ण जबाबदारी लिलावधारकाची असेल याबाबत इंटरनेट प्रणाली अथवा ऑनलाईन बॅकिंगच्या अडचणीची सबब मान्य केली जाणार नाही.

(दिलीप जगदाळे)

**अपर जिल्हाधिकारी नंदुरबार**

# जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार

सन २०१८-२०१९ करिता महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ चे नियम ६८ ते ७० नुसार, तसेच वाळू / रेती निर्गती बाबत महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक गौखनि १०/०६१५/प्र.क्र.२८९/ख, दिनांक ०३/०१/२०१८ मधील तरतुदीनुसार व राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व राज्यस्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाच्या पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीनुसार

➢ **<u>वाळू लिलाव धारकासाठी सर्वसाधारण निर्देश, अटी व शर्ती</u>**

१. वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा अधिक बोलीने ई-(ऑक्शनव्दारे) भरून लिलावाला सुरूवात करण्यात येईल.

२. ई-टेंडर/ई-ऑक्शनव्दारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास, विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरून त्या वाळू गटाचा १० दिवसाचे आत फेरलिलाव करण्यात येईल.

३. ई-टेंडर/ई-ऑक्शनव्दारे लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणून रूपये ३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रु.मात्र) किंवा अपसेट प्राईसच्या २५% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम म्हणून रोखीने भरावी लागेल परंतू ज्या वाळू गटाची हातची किंमत रूपये १० लाखपेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या २५% अनामत रक्कम रोखीने भरावी लागेल.ज्या लिलावधारकाची अत्युच्च बोली/निविदा स्विकारण्यात येईल, त्याची रक्कम नियमानुसार त्याने भरावयाच्या बोलीच्या १/४ रकमेत समायोजीत करण्यात येईल. ज्या लिलावधारकाची बोली /निविदा स्विकारण्यात येणार नाहीत, त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येतील.

४. लिलावाने घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळू साठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घेण्याची जबाबदारी संबधित लिलावधारकाची राहील. त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

५. **वाळू/ रेती गटाचा कालावधी /मुदत**

अ) ३००० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव, ३ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात येतील.

ब) ३००० ते ४५०० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव, ४ ½ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात येतील.

क) ४५०१ ते ६००० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव, ६ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जे कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात येतील

ड) ६००१ ब्रास व त्यावरील परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव दिनांक ३० सप्टेंबर पर्यंतच्या कालावधीसाठी करण्यात येतील.

६. पाण्याखालील वाळूगटामधुन दिनांक १० जुन ते ३० सप्टेंबर या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही.

७. ई-टेंडर/ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांचा राहील व सदर निर्णय लिलावाच्या दिवशी कळविण्यात येईल.

८. ई-टेंडर /ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर व १/४ रक्कम भरल्यानंतर १५ दिवसात बोलीची उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतच्या हमीचे दायीत्व स्वीकारणाऱ्या दोन व्यक्तीसह, निविदा / लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रूपये १००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) त्वरीत करारनामा करून देईल. अपवादात्मक परिस्थितीत लिलावाच्या बोलीच्या 3/4 रक्कम भरण्याची मुदत १५ दिवसापर्यंत वाढविण्याचे अधिकार, त्यासंबंधीचे कारणे नोंदवून, जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र अशा परिस्थितीत लिलावधारकास विलंबाने भरलेल्या सदर रक्कमेवर १५ टक्के वार्षिक दराने व्याज भरावे लागेल.असे करारपत्र करून न दिल्यास त्याने भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित रेती/वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न केल्यास परिणामी लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रक्कमेपैकी अ.क्र ३ प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली ७५% रक्कम सर्वोच्च ई-निविदा/ई-लिलाव स्विकारल्यापासून १५ दिवसात एक रकमी भरावी लागेल. लिलावधारकांने शिल्लक राहीलेली ७५% रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशिरात उशीरा ७ दिवसात देण्यात येईल.

९. ज्यावेळी रेती /वाळू ठेका लिलाव रद्द करण्यात येईल, अशा वेळेस त्या रेती /वाळू क्षेत्राचा नव्याने ई-निविदा /ई-ऑक्शन पध्दतीने फेरलिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेर लिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

१०. लिलावधारक त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/ वाळू काढण्याने जमीनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतीना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वतः उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णय अंतिम असतील.

११. विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी रेती/वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते/पायवाटा म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून रेती /वाळू काढता येणार नाही.

१२. लिलावधारकाने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

१३. लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या /मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे सिमेंट (R.C.C.) चे पुरेशा लांबीचे खांब उभारावे.

१४. कोणत्याही रेल्वेच्या पूलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मिटर्स (२००० फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी-नाल्यांवर पूल आहेत त्यांच्या स्तंभापासून १०० मीटर्स रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

१५. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे किंवा इतर बंधारे/बांध असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या पलीकडे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळू चे उत्खनन करता येणार नाही.

१६. सार्वजनिक पाणवठा /पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलीकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

१७. जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करून दर्शविणेत यावी. लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगीने सदर वाळू गटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक, कर्मचारी यांची नाव, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

१८. लिलावधारकाने वाळूचा पूरवठा करण्याकरीता सहकारी संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.

१९. वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतेही हानी / नूकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची /नूकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहिल व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे संबंधित लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

२०. ई-टेंडर/ ई-ऑक्शनव्दारे दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा वाळू/रेती काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. लिलावधारकास कोणत्याही वैध कारणामुळे ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध यांमुळे उत्खननास किंवा वाहतूकीस बाधा आल्यास किंवा वाळूगटाचा ताबा न दिल्यास, लिलावाची मुदत संपण्यापूर्वी, ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल, त्या कालावधीसाठी त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल अशी रक्कम परत करताना लिलावाची देकाराची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानूसार परताव्याच्या रक्कमेची परिगणना करण्यात येईल. शासन निर्णय दि. ०३.०१.२०१८ रोजीच्या धोरणातील मुद्दा क्र. २१ मधील १, २, ३ व ४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२१. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकाऱ्याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषक

परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा /रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरून हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरूध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसाची मुदत संपल्यानंतर, कोणत्याही परिस्थितीत वाळू /रेती साठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत.

२२. लिलावधारकास वाळूसाठाचा ताबा देणेपुर्वी नदीचे काठालगतचे जमीनीचे पातळीपासून (Ground Level) मंजूर केलेल्या वाळूस्थळाची पातळी (Level) किती मीटर खाली आहे हे बांबूचे / लोखंडी रॉडचे सहाय्याने मोजून घेवून त्या पातळीचे खाली २ मी. पर्यंत उत्खनन अनुज्ञेय असेल. त्यासाठी लिलावधारकास मंजूर वाळु स्थळाचे पातळीत (Level) बेंच मार्क निश्चीत करुन देण्यात येईल. यासाठी येणारा खर्च हा लिलावधारकाने सोसावयाचा आहे.

२३. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही रस्ते उपलब्ध नाहीत वाळू स्थळात पाणी आहे तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

२४. लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतूकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळूगटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवणूक करुन विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतूकीसाठी ट्रॅक्टर, ट्रॉलीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवड्याला तहसिलदार यांना सादर करावे.

२५. प्रत्येक वाळू गटाच्या ठिकाणी २४/ ७ छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत CCTV बसविण्यात यावेत. यापैकी किमान १ CCTV कॅमेरा वाहतूकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळू भरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात यावा व वाळू गटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहणे गावातील ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळू गटाच्या ठिकाणी बसविलेल्या CCTV किंमत लिलावधाकरांना सोसणे आवश्यक राहील.

२६. लिलावधाकरांनी बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतूकीचे छायाचित्रण असलेली सी.डी. दर १५ दिवसांनी तहसीलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.

२७. संबंधित तहसीदार / उपविभागीय अधिकारी अशा सी.डी. ची तपासणी करतील अशा तपासणीत CCTV कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निर्देशानास आल्यास, मंजूर वाळूसाठी व वाळू उत्खननासाठी उपलब्ध् दिवस यासाठी दरदिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेऊन जेवढे दिवस / तास CCTV कॅमेरा बंद होता, तेवढे दिवस/तास सरासरी उत्खनन केले असे गृहीत धरुन लिलावाच्या रक्कमनुसार प्रति ब्रास

रक्कम परिगणीत करुन त्या दराने CCTV कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूच्या रक्कमेएवढी दंडात्मक रक्कम लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल. एखाद्या दिवशी कितीही कालावधीसाठी CCTV बंद असला, तरी पूर्ण दिवसासाठी CCTV बंद असल्याचे समजून वरील प्रमाणे दंडात्मक रक्कमेची आकारणी व वसूली करण्यात येईल.

२८. नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातुन वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी अशा प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही.

२९. उत्खनन केलेल्या वाळूच्या/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करून दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही. अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

३०. नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी त्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

३१. रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपर्यंतच वाळू/रेतीचे उत्खनन जास्त उत्खनन करण्यात येउ नये. नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

३२. रेती /वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात दयावी.

३३. वाळु /रेती वाहतूकीसाठी महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभागाचे परिपत्रक दि. ०२ फेब्रुवारी २०१६ व त्यालगत केंद्र शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील दि. १५ जोनवारी २०१६ पासनू बारकोड प्रणाली लागु करण्यात आलेली असल्याने बारकोडयुक्त पावती पुस्तकांचा वापर करणे अनिवार्य आहे.

३४. वाळू उत्खनन व वाहनासाठी महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारीत सुलभ Mahamining प्रणाली अथवा शासनाकडून सुचीत करण्यात आलेली प्रणाली किंवा जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी निश्चित करतील अशी बारकोड युक्त संगणकीय प्रणाली वाळू लिलावधारकास या प्रणालीचा वापर करणे अनिवार्य राहील. सदर प्रणाली रेती उत्खनन व वाहतूक यावर नियंत्रण ठेवण्यासाठी असल्याने त्यासाठी लागणारा खर्च संबंधीत ठेकेदार यांना सोसावा लागेल.

३५. सदर प्रणालीनूसार लिलावधारकास त्याचे ०३ मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील.

३६. लिलावधारक निर्धारित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करून प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळूगटाचे नाव/क्रमांक, वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरून एसएमएस व्दारे (sms) निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडून

लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनूसार त्यास Invoice No. नंबर प्राप्त होईल. असा Invoice No. प्राप्त झाल्याशिवाय लिलावधारकास वाळू/रेतीची वाहतूक करता येणार नाही. बारकोड पावती व त्यामधील Invoice No. शिवाय वाहतूक केल्यास ती अवैध ठरवून त्यावर प्रचलित कायदे व धोरणानूसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

**३७.** वाळू/रेती वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडुन केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनलचालकाकडे असणाऱ्या पावतीत वैध बारकोड पावती आढळली नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याचेविरुध्द महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८ (७) व (८), महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनयिमन) नियम, २०१३ आणि संदर्भाधिन दिनांक ०३.०१.२०१८ च्या महसूल व वनविभाग शासन निर्णयातील तरतूदी व १२/०१/२०१८ चे राजपत्र मधील तरतुदीनुसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

**३८.** लिलावधारकाकडून वाहतूक करण्यात येणाऱ्या वाळूच्या वाहनांसोबतच्या वाहतूक पासची तपासणी संबंधित गावच्या ग्रामसवेक व सरपंच यांना करता येईल. वाहनासोबत पास नसेल किंवा वाहतूक पासमध्ये खाडाखोड असेल दिनांक व वेळ चूकीचा असेल अशा त्रुटी आढळून आल्यास त्याबाबतची माहिती त्यांनी तहसीलदार यांना देणे आवश्यक राहील.

**३९.** लिलावधारकाने रेती/वाळु वाहतुक करणाऱ्या वाहनांचे नोंदणी क्रमांक तसेच वाहन क्रमांक व सदर वाहनातून किती रेती/वाळु वहन (ब्रासमध्ये) करणार आहेत याची (वहन क्षमता) माहिती तहसीलदार / जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**४०.** कोणतेही वाहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, तसेच सदर वाहनांवर मोटार कायद्यानुसार व अन्य कायद्यानुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**अ.** सदर वाहनाचा वाहतूक परवाना पहिल्या गुन्ह्यासाठी ३० दिवस, दुसऱ्या गुन्ह्यासाठी ६० दिवस व तिसऱ्या गुन्ह्यासाठी ९० दिवस याप्रकारे निलंबित करण्यात येईल.

**ब.** वाहन परवान्याबरोबर वाहन चालकाच्या लायसन्सवर मोटार कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्ह्याकरीता सहा महिन्यांकरीता निलंबित केले जाईल. अशाच प्रकारचा दुसरा गुन्हा करतांना एखादा वाहन चालक आढळल्यास त्याचे ड्रायव्हींग लायसन्स कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल. अशाच प्रकाराचे तिसरा गुन्हा करतांना एखादा वाहन चालक आढळल्यास असे वाहनचालकावर/वाहनमालक तसेच सदर प्रकरणी दोषी आढळुन आल्यास लिलावधारकावर एम. पी. डी. ए. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल.

**४१.** महसूल व वन विभाग यांचेकडील वाळू निर्गती धोरण शासन निर्णय दिनांक ०३/०१/२०१८ मधील सर्व नियम व अटी शर्ती संबंधीत यशस्वी निविदाधारक / लिलावधारक यांचेवर बंधनकारक राहतील.

४२. वाळू/रेती लिलावधारकाने नोदणीकृत मोबाईलवरून एसएमएसव्दारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायदयानूसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या वाळू / रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, महसूल अधिकारी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करून दयावीत.

४३. गौणखनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावाने/परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांच्या निरिक्षणाकरीता उपलब्ध करून दयावीत.

४४. लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रूपये ३,००,०००/- (रूपये तीन लाख फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या २५ टक्के यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे चलनाव्दारे जमा करणे आवश्यक आहे. परंतू त्या वाळू गटाची हातची किंमत रू १० लाखापेक्षा कमी असेल तर रक्कम रु. ३,००,०००/- रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. हि रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशतः अथवा पुर्णतः जप्त करण्यात येईल.

४५. वाळूचे अवैध उत्खनन/ वाहतूकीच्या अनुषंगाने कारवाई करतांना महसूल अधिकारी/ कर्मचारी यांच्या वर हल्ले होत असल्याचे निर्देशानास आल्यास किंवा अशा ठिकाणी संगटीत गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संगटीत गुन्हेगारीविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विधातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ अधिनियमान्वये कारवाई करण्यात येईल.

४६. लिलावधारकांने नियमात नमूद केलेप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदीनूसार असलेले नियम, २०१३ (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदी नुसार तसेच अन्य कायदे /नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा /वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणून केला पाहिजे.

४७. रेतीचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांचेकडे सात दिवसाच्या आत कळविले पाहिजे.

४८. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करूनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूकन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

४९. अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळू साठा रेतीगटास असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

५०. अवैध वाळू/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील ४८ (७) व (८) नूसार तसेच इतर लागू होणाऱ्या सर्व कायदे व नियमानूसार कारवाई करण्यात येईल.

५१. ई-टेंडर /ई-ऑक्शन मध्ये भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती/संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

५२. दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे जनहितास्तव कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

५३. शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.

५४. वाळु लिलाव प्रक्रिया सुरु असताना किंवा त्यांनतर वाळु घाटासंदर्भात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास इकडील कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच वाळु लिलावातील संपुर्ण रक्कम व इतर अनुषंगिक रकमा भरणे हे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

५५. मा. उच्च न्यायालयाने कोणत्याही वाळूपट्टयाबाबत /लिलावाबाबत काही आदेश/ निर्णय दिल्यास निविदाधारकांवर सदर निर्देश बंधनकारक राहील. तसेच रिट याचिका क्रं.४८३०/२०१० मध्ये दिनांक २६/१०/२०१० रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

५६. मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका ४८३०/२०१० नुसार प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी उत्खनन बंद ठेवावे.

५७. वाळु/ रेतीचे उत्खनन व वाहतूक केवळ सकाळी ०६.०० ते सांयकाळी ०६.०० या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन व वाहतूक अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

५८. आयकर / विक्रीकर अधिनियमातील तरतुदीनुसार लिलावाच्या उच्चतम रकमांचे अनुषंगाने जी. एस. टी (GST) तसेच *आयकर* (TCS) २ टक्के रक्कम भरणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस विक्रीकर व आयकर खात्यातर्फे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर व मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक राहील.

५९. यशस्वी लिलावधारकास भूपृष्ठ भाडेचा भरणा करावा लागेल.

६०. निविदाधारकाने/लिलावधारकाने जिल्हा परिषद कर / पंचायत कर व इतर सर्व प्रकारचे कर विहित केलेल्या दराप्रमाणे शासनास अदा करावे.

६१. लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस रुपये ५०००/- (रुपये पाच हजार) इतक्या रकमेचा धनादेश उपसंचालक, किंवा वरीष्ठ भुवैज्ञानिक, भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा यांच्या नावाने काढण्यात आलेला धनाकर्ष (***Demand*** **draft**) सर्वेक्षण शुल्कापोटी जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावा लागेल.

६२. लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस पर्यावरण शुल्कापोटी लिलावात गेलेल्या वाळूच्या सर्वोच्च बोलीच्या २% रक्कम पर्यावरण शुल्क म्हणुन राष्ट्रीय बॅंकेची बॅक गॅरंटीच्या स्वरुपात द्यावी लागेल.

६३. केंद्र शासनाने खाण व खनिजे (विकास व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (ब) मध्ये राज्य शसनाने अधिसूचनेव्दारे खनिकर्मामुळे बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठाण स्थापन करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडीएफ ०६१५/५१/प्र.क्र.३४/उद्योग-९, दि.०१.०९.२०१६ च्या अधिसुचनेनुसार गौण खनिजाच्या संदर्भात लिलावात जाणा-या वाळु घाटाच्या सर्वोच्च बोली किंमतीच्या १०% रक्कम ही **जिल्हा खनिज प्रतिष्ठान** या नावाने उघडण्यात आलेल्या स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा नंदुरबार या बॅंकेतील चालू **खाते क्र.३६१२९६१७३०८** या क्रमांकावर भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय वाळु गट लिलावधारकास मंजूर केला जाणार नाही.

६४. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक/गौखनि-१०/०३१६/प्र.क्र.२४८/ख, दिनांक १८ मार्च, २०१७ नुसार वाळु /रेतीच्या लिलावातील यशस्वी लिलावधारकासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मुद्रांक शुल्क भरणे अनिवार्य राहील.

६५. शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव / ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

६६. मंजूर वाळु घाटातील वाळु चोरी किंवा अवैध उत्खनन व वाहतुक थांबविणेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करणेचे अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना राहतील.

६७. **राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण** (SEIAA) **संपुर्ण अटी व शर्ती निविदा धारकास/लिलावधारकास बंधनकारक राहतील.**

1. **Specific Conditions:**
    1. Highest Bider to ensure no stream is diverted due to sand mining activity.
    2. Highest Bider shall carry out sand mining by manual method only. No mechanical/electrical/power driven devices shall be used for sand mining.
    3. Highest Bider to ensure that mining/loading activity shall be restricted to day hours time only . No mining activity shall be carried out after sunset and before sun rise.
    4. Highest Bider to adhere to the provisions stipulated in the Sustainable Sand Mining Guidelines issued by MoEF&CC, Maharashtra Minor Minerals Extraction ( Development and Regulation) Rules, 2013 and Sand Extraction Policy issued by Maharashtra Government in Revenue and Forest Department.

26. Highest Bider will be held individually responsible for non compliance of the conditions stipulated in the Environmental clearance and shall be liable for legal action under Environment (Protection ) Act of 1986.
27. Transport of sand should be through vehicles which is properly covered with Tarpaulin and it should not be overloaded.
28. Highest Bider to ensure that the mining plan is approved by Director of Geology and Mining comprising study to show that annual replenishment of sand in the mining lease area is sufficient to comprising study to show that annual replenishment of sand in the mining lease area is sufficient infrastructure is adequate to transport the mined material.
29. Provisions stipulated in Maharashtra Minor Minerals Extraction (development and Regulation Rules 2013 and Government Resolution of Revenue and Forest Department dated 03.01.2018 shall be strictly fallowed by Highest Bider.
30. Highest Bider will submitte bank guarantee up to 2% of the total auction cost for the given auction period from the Lessee to ensure the Lessee, bank guarantee so obtained shall be for feiled and legal action under the law should initiated against such Lessee.
31. The distance 3 m or 10 % of the width of river whichever is more will be kept intact as a mining zone.
32. No cutting of the trees shall be done while excavating the sand or while constructing the access road to sand ghat.
33. All mining shall be carried out manually.
34. Underwater mining shall not be permitted without the specific expert sanction of the State Government only for prevention of flood and increasing the capacity of reservoir if any it shall be ensured that excavation of minor mineral does not disturb or change the underlying soil characteristics of the river bed/basin, where mining is carried out.
35. It shall be ensured that mining does not in any way disturb the turbidity, velocity and flow pattern of the river water.
36. It shall be ensured that there is no fauna dependent on the river bed or areas close to mining for its nesting is disturbed.
37. Turtle nesting units conservation is very important. Therefore sand mining in such areas is to be prohibited.
38. Precise mining area will be jointly demarcated at site by officials of Mining/Revenue department prior to mining operations for all proposals under considerations. Such site plan duly verified by competent authority shall be submitted to Environment Department.
39. All Necessary statutory clearances shall be obtained before start of mining operations.
40. No mining shall be carried out in the live streams.
41. Mining shall be limited to day hours time only.
42. No mining shall be carried out in the safety zone of any bridge and/or embankment.
43. No mining shall be carried out in the vicinity of natural / manmade archaeological sites.
44. The lease holder shall obtain necessary prior permissions of the competent authorities for drawal of requisite quantity of water ( surface water and groundwater), if required for the project. Waste water, if any, shall be properly collected and treated so as to conform to the standards prescribed by MoEF/CPCB.
45. No wildlife habitat will be infringed.
46. Environmental clearance is subject to obtaining clearance under the Wild life (Protection) Act, 1972 from the competent authority, if applicable to this project.
47. Green belt development shall be carried out considering CPCB guidelines including selection of plant species and in consultation with the local DFO/Horticulture Officers.
48. Parking of vehicles should not be made on public places.
49. It shall be development shall ensure that there is no leakage of oil and grease from the vehicles used for transportation.

50. Special Measures shall be adopted to prevent the nearby settlements from the impacts of mining activities. Maintenance of roads through which transportation of minor minerals is to be undertaken, shall be carried out-regularly.
51. Provision for first-aid, medical health care safe drinking water, and sanitation etc. shall be provided at site.
52. Ambient air quality will be monitored at the site and the nearest habitation regularly. Ambient air quality at the boundary of the precise mining area shall conform to the norms prescribed by MoEF & CC, GOI.
53. Measures shall be taken for control of noise level to the limits prescribed by CPCB
54. Any Change in mining area, khasra/Gat numbers, entailing capacity addition with change in process and or mining technology, modernization and scope of working shall again require prior Environmental Clearance as per provisions of EIA Notification, 2006 (as amended.)
55. The environmental clearance is being issued without prejudice to the action initiated under EP Act or any court case pending in the court of law and it does not mean that project proponent has not violated any environmental laws in the past and whatever decision under EP Act or of the Hon'ble court will be binding on the project proponent. Hence this clearance does not give immunity to the project proponent in the case filed against him, if any or action initiated under EP Act.
56. In case of submission of false document and non- compliance of stipulated conditions, Authority/Environment department and District Administration reserves the right to add any stringent condition or to revoke the clearance if conditions stipulated are not implemented to the satisfaction of the department or for the matter, for any other administrative reason after consolation with SEIAA.
57. The Environment department and District Administration reserves the right to add any stringent condition or to revoke the clearance if conditions stipulated are not implemented to the satisfaction of the department or for that matter, for any other administrative reason after consultation with SEIAA.
58. In case of any deviation or alteration in the project proposal from the one submitted to this department for clearance, a fresh reference should be made to the department to assess the adequacy of the conditions (S) imposed and to incorporate additional environmental protection measures required, if any.
59. The above stipulations would be enforced among others under the Water (Prevention and Control of pollution ) Act, 1974, the Air (Prevention and Control of Pollution) Act, 1981 the Environment (Protection) Act, 1986 and rules there under, Hazardous Wasted (Management and Handing) Rules, 1989 and its amendments, the public Liability Insurance Act, 1991 and its amendments.)

## पर्यावरण विषयक अटी व शर्ती

जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समिती व जिल्हास्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाच्या पर्यावरण मंजूरीतील अटी व शर्तीनुसार संबंधित यशस्वी निवीदाकार / लिलावधारक यांचेवर बंधनकारक राहतील.

१) निविदारधारक/लिलावधारक यांना पाण्याखालील वाळूचे उत्खनन करण्यासाठी यांत्रीक साधनाचा (उदा. सक्शन पंप इ.) वापर करता येणार नाही. तसेच मा. राष्ट्रीय हरित लवाद येथे दाखल केलेली याचिका क्र. MA No.६०१/६०२/६०८/६०९/२०१७, OA३६८/२०१५ मधील आदेश व मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले आदेश निविदारधारक/लिलावधारक यांना लागू राहतील.

२) रेती उत्खनन करताना आजुबाजूचे विद्युत मनोरे, जलवाहिन्या, रेल्वे पूल इत्यादी राष्ट्रीय संपत्तीला व अतिमहत्वाच्या ठिकाणांना तसेच संवेदनशिल क्षेत्राला कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचणार नांही याची खबरदारी घेण्यात यावी. अशा प्रकाराचा धोका निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक / लिलावधारकावर राहिल व यासंदर्भात त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३) लिलावधारकाने महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांचे सल्ल्याने प्रदूषण टाळणेबाबतच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. तसेच, कोणत्याही वाहनातून इंधन अथवा ग्रीसची गळती होणार नाही. त्याबाबतची दक्षता घ्यावी.

४) लिलावधारकाने उत्खनन क्षेत्रात केंद्रीय प्रदूषण मंडळाने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक ध्वनी प्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) पर्यावरण संरक्षण कायद्यातील तरतुदींचा भंग झाल्यास पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत उत्खननाची देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

६) लिलावधारक/परवानाधारक यांना पर्यावरण विषयक अटी व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदीचे पालन करणे बंधनकारक आहे.

७) पर्यावरणाचे संतूलन राखण्यासाठी निकामी रेती / वाळूचे साचलेले ढीग परत नदीचे पात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. याबद्दल संपुर्ण जबाबदारी निविदाधारक/ लिलावधारक यांची राहील.

८) सिलटेशन (siltation) स्टडीबाबतचा अहवाल रेती / वाळू उत्खननापुर्वी अथवा वाळू उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी, तज्ञ एजन्सी जसे NIO/ CWPRS *कडून* करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडेस सादर करावा लागेल.

९) ज्या ठिकाणी कासवांची घरटी (Turtle Nesting) असेल त्या ठिकाणाहून वाळू उत्खनन करण्यात येऊ नये.

१०) मंजूर क्षेत्रापैकी कमीतकमी २०% क्षेत्रामध्ये नदी तिरावर झाडे लावून हरीयाली (Green Belt) *करावी* लागेल. उत्खननाच्या वेळी Soil erosion व Silt management *च्या* बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यात याव्यात.

११) उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल. आवश्यकता भासल्यास उत्खननाच्या जागेवर मजुरांना जेवण बनविणे, शुध्द पाणी, वैद्यकीय उपचार व इतर सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल.

१२) लिलावधारकास वाळू / रेती उत्खनन करणेकामी सक्शन पंपाचा वापर अनुज्ञेय राहणार नाही. वाळू/रेती गटातून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसेबी अशा कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही.

वरील पैकी कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास सर्व प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल तसेच अनामत रक्कम व लिलावधारकांने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करून लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(दिलीप जगदाळे)

**अपर जिल्हाधिकारी नंदुरबार**

**वाळू / रेती लिलावात भाग घेणाऱ्या ई-ऑक्शन / ई- निविदाधारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रक्कम रु. 100/- चे मुद्रांकीत स्टँम्प पेपरवर दोन साक्षीदारांचे स्वाक्षरीसह द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.**

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी नामे (पूर्ण नांव)------------------------------------------------------------------ --- -------------- राहणार (पोस्टाचा पूर्ण पत्ता द्यावा)------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

तालुका ------------------ जिल्हा ------------------------ -राज्य------------------------

माझी/माझे संस्थेचे पॅन क्रमांक ------------------------------------- टिन क्रमांक--------- ----- ------------------ जीएसटी क्रमांक -------------------------------

मी प्रतिज्ञापुर्वक घोषित करितो की, मला नंदुरबार जिल्हयातील सन २०१८-२०१९ या वर्षासाठी घेण्यात येणाऱ्या लिलावातील रेती/वाळू घाटाच्या सर्व अटी व शर्तीची जाणीव आहे. मी ई-निविदेत प्रस्तावित केलेल्या किमतीत वाळू घाट घेण्यास इच्छूक असून त्याची २५ टक्के अनामत रक्कम मी शासन जमा करीत आहे.

मला सदर वाळू घाट मंजूर झाल्यास ¼ रक्कम मी त्याचदिवशी ऑनलाईन पध्दतीने पेमेंटद्वारे शासनाकडेस जमा करेल. तसेच ई-टेंडर / ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोली स्विकारल्यानंतर व ¼ रक्कम भरल्यानंतर १५ दिवसांत बोलीची उर्वरीत ¾ रक्कम भरण्यास तयार असून याबाबत हमीसुध्दा याद्वारे करुन देत आहे. वरील प्रमाणे हमीपत्र /करारपत्र करुन न दिल्यास मी भरलेली ¼ रक्कम जप्त करण्यांत येईल याची मला जाणीव आहे. तसेच मी घेतलेल्या रेती / वाळू गटाचा फेरलिलाव करण्यांत येईल. मी घेतलल्या वाळू गटाचा फेरलिलाव झाल्यास माझे होणारे आर्थिक नुकसानाची जबाबदारी शासनावर राहणार नाही. ताबा घेण्यापूर्वी संपूर्ण रक्कम मी ऑनलाईन पेमेंटद्वारे भरणा करून मंजूर वाळू घाटाचे निष्पादन करून घेण्याची हमी देत आहे. असे न केल्यास मी जमा केलेली २५ टक्के अनामत व लिलावाच्या सर्वोच्च बोलीच्या ¼ रक्कम शासन जमा करण्यांत यावी व नियमानुसार दुस-या यशस्वी ई-निविदाधारकास रेती घाट मंजूर केल्यास अथवा फेर ई-निविदेद्वारे विल्हेवाट केल्यास तसेच शासनास झालेले नुकसान जमीन महसूल थकबाकी म्हणून वसुल केल्यास माझी काहीएक हरकत राहणार नाही याची मला जाणीव आहे.

वाळु लिलाव प्रक्रिया सुरु असताना अथवा वाळु लिलाव प्रक्रियेनंतर मी घेतलेल्या वाळु घाटासंदर्भात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास वाळु घाटाची संपुर्ण रक्कम भरणेची जबाबदारी माझी राहील तसेच याबाबत मी कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा रक्कम भरणेस नकार दिल्यास मी कारवाईस पात्र राहील.

मी असेही घोषित करतो की, महसूल यंत्रणेने ताबा देण्याच्या तारखेस व वेळेस मी हजर राहून ताबा घेईल. मुदतीत ताबा न घेतल्यास माझ्यावर होणाऱ्या कारवाईस मी पात्र राहिल. तसेच निविदेतील मुदत संपण्यावर मी मुदतवाढीसाठी कोणत्याही कोर्टात दावा करणार नाही.

मी असेही घोषीत करतो की,

1) सदरहू रेती/वाळू घाट आणि अनुमोदीत रस्त्याची मी पाहणी केली आहे. त्यामुळे वाळु उत्खनन झाल्यानंतर वाहतुकीची संपूर्ण जबाबदारी माझी असल्यामुळे भविष्यात वाहतुकीचा व रस्त्याबाबत प्रश्न निर्माण झाल्यास त्याचा निपटारा करण्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. तसेच रस्त्याबाबत अडचण निर्माण झाल्यामुळे वाळु उत्खनन न झाल्यास किंवा वाहतूक न झाल्यास शिल्लक वाळु साठयाबाबत मी शासनाकडे कोणत्याही प्रकारची भरपाई मागणार नाही.

2) वाळूचा दर्जा, साठा व त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती / वाळू वाहतुकीसाठी योग्यते बाबत मी इतर कोणताही आक्षेप उपस्थित करुन वाद निर्माण करणार नाही.

3) नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी अशा प्रकारच्या कोणत्याही यांत्रिकी साधनांचा वापर अनुज्ञेय नाही याची मला जाणीव आहे.

4) प्रस्तुत वाळु लिलाव हा सन 2018-2019 या वर्षासाठी असल्याने शासन निर्णय दिनांक 03 जानेवारी 2018 च्या वाळु रेती सुधारित निर्गती धोरणानुसार वाळु उत्खनन हे दिनांक 30 सप्टेंबर 2019 पावेतोच करता येईल याची मला जाणीव असून कोणत्याही परिस्थितीत वाळु उत्खननाची मुदत वाढवून मिळणेबाबत मी प्रयत्न करणार नाही. सन 2018-2019 या वर्षासाठीच्या वाळु घाटाच्या परिमाणानुसार उत्खनन करण्याची संपूर्ण जबाबदारी माझी असल्यामुळे परिमाणापेक्षा कमी उत्खनन झाल्यास शिल्लक वाळु साठ्याबाबत मी शासनाकडे कोणत्याही प्रकारची भरपाई मागणार नाही.

5) मी याव्दारे असेही घोषीत करतो की, माझे नाव रेतीघाट प्रक्रियेबाबत किंवा रेतीघाट चालविण्याबाबत काळ्या यादीत नाही. तसे निदर्शनास आल्यास मी फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

वर नमुद केलेले विवेचन हे या प्रतिज्ञापत्राव्दारे करुन देत असून शासनाच्या वाळु लिलावाच्या ज्या अटी शर्ती आहेत त्या मला मान्य आहेत. अटी शर्तीचे उल्लघन झाल्यास मी कारवाईस पात्र राहील. सदरचे प्रतिज्ञापत्र केले असे

**ठिकाण** :-

**दिनांक** :- /02/2019

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

**साक्षीदार**

1. पुर्ण नाव ---------------------------------- स्वाक्षरी --------------------
पत्ता-------------------------------------

2.पुर्ण नाव ------------------------------------ स्वाक्षरी --------------------
पत्ता-------------------------------------------

विषय :-सन 2018-19 या वर्षातील वाळू / रेती घाटाचे विवरणपत्र

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | वाळू स्थळाचे नांव | नदीचे नाव | गट नंबर | सन 2018-19 साठी निश्चित केलेल्या वाळू गटाचे क्षेत्र | | | | सन 2018-19 करीता उपलब्ध होऊ शकणारा वाळू साठा (ब्रास) | सन 2018-19 मधील प्रतीब्रास रक्कम रु. | सन 2018-19 करीता प्रस्तावित केलेली अंतिम अपसेट किंमत | 25% (EMD) इसारा रक्कम | Proposed budget for implementation of Environmental Management Plan for Sand Ghat EMP Budget ( Rs. In Lakh) Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | लांबी (मीटर) | रूंदी (मीटर) | खोली (खोली) | वाळू साठ्याचे क्षेत्रफळ | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 1 | नंदुरबार | शहादा | ससदे-1 | तापी | 564 | 130 | 70 | 2 | 9100 | 6431 | 1998 | 12849138 | 3212285 | 4.57 |
| 2 | | | बिलाडी तसा | तापी | 9 | 270 | 60 | 2 | 16200 | 11449 | 1998 | 22875102 | 5718776 | 4.57 |
| 3 | | | टेंभे बु | तापी | 303 | 170 | 50 | 2 | 8500 | 6007 | 1998 | 12001986 | 3000497 | 4.57 |

(दिलीप जगदाळे)
अपर जिल्हाधिकारी नंदुरबार